# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक ०४.०५.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०३.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ०५ ईसमावर कारवाई करून एकुण ३,६५५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच, जुगार कायदा अन्वये ०१ केसमध्ये ०४ इसमांवर कारवाई करुन ७६,८२०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,८८१ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,६५,८००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०३.०५.२०२६ चे १०.३० वा. चे सुमारास, फिर्यादी सोबत खाजगी कंपनीत काम करणारे मित्र हरीचंद्र महादेव मेश्राम वय ५२ वर्ष रा. साईनगर, गंगोत्री अपार्टमेंट, हिंगणा रोड, नागपूर हे पोलीस ठाणे एम. आय.डी.सी. हद्दीत महेंद्र ट्रॅक्टर कंपनी, हनुमान मंदीर समोरील रोड पायदळ क्रॉस करीत असता, तिनचाकी ऑटोरिक्शा क्र. एमएच ३१ एफबी ५८७९ चे चालकाने त्याचे ताब्यातील ऑटोरिक्शा भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मित्रास धडक दिल्याने ते खाली पडून गंभीर जखमी झाले. गंभीर जखमी यांना उपचाराकरीता लता मंगेशकर हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी मोहन पतरुजी चौधरी वय ४३ वर्षे रा. वार्ड क्र. १०, इंदीरामातानगर, एमआयडीसी नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. येथे सपोनि. मोहीते ९४२३४८२३२५ यांनी ऑटोरिक्शा चालकाविरूध्द कलम २८१,१०६(१) भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे नंदनवन :— आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी यांची बहिण श्रीमती संगिता श्रीराम ढबाले वय ५२ वर्षे रा. फ्लॅट क्र. ए/१३/०१, व्यंकटेश नगर, केडीके कॉलेजजवळ, नंदनवन, नागपूर तसेच त्यांची मुलगी व फिर्यादीची भाची नामे सौ. आकांक्षा लोकेश ब्रम्हे वय २९ वर्ष रा. प्लॉट क्र. ६६, ओमनगर, निवृत्ती पार्कजवळ, सक्करदरा, नागपूर यांनी दिनांक

०१.०५.२०२६ रोजी व्यंकटेशनगर येथे राहते घरी दोघींनि गळफास घेऊन आत्महत्या केली होती. याप्रकरणी पोलीस ठाणे नंदनवन येथे अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली होती.

अकस्मात मृत्यूचे चौकशीत, तसेच फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांची भाची आकांक्षा हिचे लग्न झाल्यापासून तिचा पती आरोपी क्र. १) लोकेश सुधाकर ब्रम्हे वय ३० वर्ष २) सासरा, सुधाकर ब्रम्हे वय ६० वर्ष ३) सासु, सौ. अनुसया सुधाकर ब्रम्हे वय ४८ वर्ष सर्व रा. प्लॉट क्र. ६६, ओमनगर, सक्करदरा, नागपूर तसेच आरोपी क्र. ४) नणंद, सौ. प्राची अमोल डफ ५) अमोल डफ दोन्ही रा. प्लॉट क्र. ३०५, अंबर अपार्टमेंट, मदनरतन सिटी, नंदनवन, नागपूर यांनी संनगमत करुन फिर्यादीची भाची हिला माहेरून पैसे आणण्याचे कारणावरून तिचा शारीरिक व मानसिक छळ केला. तसेच तिला मुलगा न होता, मुलगी झाल्याने व ती जन्मानंतर लगेच मरण पावली या कारणावरुन छळ करुन, तसेच मारहाण करुन फिर्यादीचे बहिण व भाची यांचे नावे असलेली शेतजमीन आरोपीचे नावे करावी याकरीता क्रुर वागणूक देऊन हुंडयासाठी छळ करुन त्यांना आत्महत्येस प्रवृत्त केले.

फिर्यादी विलास केशवराव पिसे वय ४७ वर्ष रा. माथनी ता. मौदा जि. नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. डी.डी.बोरकर ९६३७६३२१२८ यांनी आरोपींविरूध्द कलम ८०(२),१०८,११५(२),३५१(२),३(५) भा.न्या.सं., सहकलम ३,४, हुंडाबळी कायदा १९६१ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे बेलतरोडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०२.०५.२०२६ चे ०६.३० वा. ते ०३.०५.२०२६ चे ०९.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, प्लॉट क्र. ११३, शिल्पा सोसायटी, शनिधाम मंदीर जवळ, नागपुर येथे राहणारे फिर्यादी प्रदीप तुकाराम अवचट वय ६३ वर्षे हे त्यांचे राहते घराचे मुख्य दाराला कुलूप लावून घराची चावी त्यांचे ऑफीसमध्ये काम करणारे कर्मचारी कमलाकर लिचडे वय ६१ वर्ष रा. प्राईड हॉटेलचे मागे, नागपूर यांचेकडे देऊन परिवारासह आजारी व्याही यांना भेटणेकरीता वर्धा येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप बनावट चावीने उघडून, आंत प्रवेश करून, घरातील बेडरुमचे लॉकरमध्ये ठेवलेले सोन्याचे तसेच हिरेजडीत सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ४,७०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. श्रीकांत गोरडे ८३९०८७१७४२ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**